स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६**
Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in ddtpho_ pune@rediffmail.com

---

## कार्यालयीन आदेश

**विषय :** नगर रचनाकार, गट-अ (राजपत्रित) मधील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भ:** १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५ /प्र.क्र.१/ ९५/ बारा, दिनांक ८ जून १९९५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जुलै २००१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी २००२.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१०.
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दिनांक ५ जुलै २०१०.
६) शासन, नगर विकास विभाग,आदेश क्र.टिपीव्ही-१५०४/९/ प्र.क्र.१००/नवि-२७, दि.३०/०७/२०२१
७) शासन, नगर विकास विभाग आदेश क्र.टिपीव्ही-१५०४/९/ प्र.क्र.१००/नवि-२७, दि.११/०८/२०२१.
८) शासन, नगर विकास विभाग पत्र क्र.न्यायाप्र-४०१७/१०८०/ प्र.क्र.१३५/नवि-२७, दि.१७/०८/२०२१.
९) शासन, नगर विकास विभाग पत्र क्र.संकीर्ण-५०२१/ सं.क्र.१६९७/ नवि-२७,दि.०८/११/२०२१

संदर्भ (१) दिनांक ८ जून १९९५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमलात आलेली गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (२) दिनांक २०, जुलै २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली असून त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे. संदर्भ (३) दिनांक ११ जानेवारी, २००२

रोजीच्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब मधील राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी/कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

०२. संदर्भ क्र.(२) दि.२० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे**. ही योजना कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड पे घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना इतर शर्ती व अटींचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

०३. संदर्भ क्र.(४) दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, कार्यान्वित असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.५ जुलै, २०१० अन्वये, शासनामधील पदोन्नतीची संधी नसलेल्या तसेच एकाकी पदांना दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सदरहु सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४००/- पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या एकाकी पदांवरील कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आली असून या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत कमाल दोन वेळा वेतन संरचना मंजूर करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

०४. शासन, वित्त विभागाच्या संदर्भ क्र.(६) च्या दि.०१ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये विहित संधीत/ मुदतीत अर्हता परिक्षा किंवा विभागीय परिक्षा उत्तीण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावलेल्या व परिणामी कालबध्द पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या काही कर्मचाऱ्यांनी कालबध्द पदोन्नतीचे लाभ मिळणेबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.२२/२००५, क्र.७३१/२००६, क्र.३५७/२००६,क्र.३२८/२०१० व संलग्न मूळ अर्ज यामधील अर्जदार तसेच मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमधील पारित न्याय निर्णयाच्या अनुषंगाने, शासनाचा वित्त विभागाकडील दि.१५/१०/२००९ रोजीच्या शासन निर्णय दि.२१/०५/२०१० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये रद्द करुन (Canceling)पुढीलप्रमाणे सुधारित शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(अ) अर्हता परीक्षा किंवा विभागीय परीक्षा विहित संधीत/ मुदतीत उत्तीर्ण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावली असेल अशा कर्मचाऱ्यांने १२ वर्षांच्या नियमित सेवा कालावधीत सदर परीक्षा उत्तीर्ण केल्यास त्याला नियमित सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतरच्या लगतच्या तारखेस.

अथवा

(ब) १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर, विभागीय/ ***अर्हता परीक्षा*** उत्तीर्ण झाल्याच्या तारखेस

०५. उपरोक्त (अ) अथवा (ब) यापैकी कोणत्याही प्रकारात मोडणाऱ्या कर्मचारी/ अधिकारी यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील पात्रतेनुसार, (त्याच्या सुधारीत ज्येष्ठता सूचीतील स्थानात बदल न करता) कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत/ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे.

०६. श्री.सु.तु.शिंदे, नगर रचनाकार यांना अंबरनाथ नगरपरिषद,जि.ठाणे येथे कार्यरत असताना बांधकाम परवानगी प्रकरणांमध्ये नियमापेक्षा जास्त चटई क्षेत्र निर्देशांक देऊन प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदींच्या भंग केल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करुन त्यांना शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि.०३/०५/२००६ रोजीच्या शासन आदेशान्वये शासन सेवेतून बडतर्फ केले होते. सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे दि.१८/०७/२०१७ रोजीचे आदेश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.०५/०१/२०२१ रोजीचे आदेश व मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.२९/०६/२०२१ रोजीचे आदेश विचारात घेता, श्री.शिंदे,तत्कालीन नगर रचनाकार यांच्यावर दि.०३/०५/२००६ रोजीच्या आदेशान्वये लादलेली शिक्षा संदर्भ क्र.६ च्या शासन आदेशान्वये रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे, श्री.शिंदे,यांची बडतर्फी असमर्थनीय ठरली आहे.

०७. संदर्भ क्र.(७) च्या आदेशान्वये श्री.सु.तु.शिंदे, तत्कालीन नगर रचनाकार यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१. श्री.शिंदे हे दि.२८/०२/२०२१ रोजी शासन सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून संदर्भ क्र.६ च्या शासन आदेशान्वये श्री.शिंदे यांचेवरील सिध्दापराध सक्षम न्यायालयाने रद्द ठरविला असल्याने त्यांना उक्त दोषारोपातून मुक्त केले आहे.

२. आता, वरील पार्श्वभूमीवर श्री.सु.तु.शिंदे, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२(ए) व (बी) मधील तरतुदीचा वापर करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

(अ) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (ए) व (बी) मधील तरतूदींचा वापर करुन श्री.सु.तु.शिंदे, सेवानिवृत्त नगर रचनाकार यांचा दि.०३/०५/२००६ ते दि.२८/०२/२०२१ हा निलंबन कालावधी सेवाविषयक सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून "कर्तव्य कालावधी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(आ) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ७२ (३) व ७२(४) मधील तरतूदीनुसार श्री.सु.तु.शिंदे,तत्कालीन नगर रचनाकार यांना निलंबित करण्यात आले नसते तर,जितके वेतन व भत्ते मिळण्यास ते हक्कदार झाले असते,तितके पूर्ण वेतन व भत्ते श्री.शिंदे यांना अदा करण्यात यावेत.

०८. उपरोक्त सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक ०१/०२/२०२०रोजीच्या शासन, वित्त विभागाच्या शुध्दीत्रकातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील नगर रचनाकार, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती

योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

**सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ.**

१) नगर रचनाकार पदावर कार्यरत खालील अधिकाऱ्यास पहिला लाभ म्हणून सहायक संचालक, नगर रचना (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ६६००/-) मध्ये तर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३, रु.६७७००-२०८७००/- मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

२) दि.१ एप्रिल, २०१० रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार पदविकाधारक नगर रचनाकारांबाबत, रचना सहायक पदावरील ५ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर देण्यात आलेली वरिष्ठ वेतनश्रेणी (दर्जा) हा योजनेचा पहिला लाभ म्हणून धरण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.सु.तु.शिंदे डी.सी.ई. | अ.जा. (वैध) | ०१/०८/२०११ | ----- | दि.२९/०६/१९९५ पासून नगर रचनाकार पदावर कार्यरत. सदरहू पदावर १२ वर्षाची नियमित सेवा झाल्यानंतर दि.२९/०६/२००७ पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मिळणेस (सहायक संचालक, नगर रचना या पदाची वेतनश्रेणी) पात्र, परंतु नियुक्तीच्या वेळची शैक्षणिक अर्हता डी.सी.ई. असल्याने नगर रचना संचालनालयातील तांत्रिक संवर्गाचे सेवाप्रवेश नियम, २०११ नुसार दि.०१/०८/२०११ पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर |

०९. वरील अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र.११ (१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. संदर्भ क्र.(७) ते (९) नुसार संबंधितास सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे. सदर आदेशात नमूद करण्यात आल्यानुसार त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या रक्कमेचा फरक सहसंचालक,नगर रचना,कोकण विभाग, नवी मुंबई या कार्यालयाकडून अदा करण्यात यावा.

३. सदरहू अधिकारी यांना सहसंचालक,नगर रचना,कोकण विभाग, नवी मुंबई या विभागीय कार्यालयाने वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.

४. शासन निर्णय दि.१ जुलै, २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर अधिकाऱ्याचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

५. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित अधिकाऱ्याच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे.)**

22/11/21

(वि.ल.वाघमोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/गट-अ/प्रशा-१/५३३४
मध्यवर्ती कार्यालये, पुणे – ४११ ००१
दिनांक -22/११/२०२१

**प्रत माहितीस्तव सादर-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई.
२) मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) मा.महालेखापाल, मुंबई-१/नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग.
२) उपसंचालक, नगर रचना, ना.सं.घ.,पुणे.
३) कोषागार अधिकारी, ठाणे.
४) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, प्रशा-१/१अ/१ ब/प्रशा-२/लेखा/अर्थसंकल्प.
५) श्री.पालकर, स्वी.स./श्रीमती हुपरे, उ.श्रे.ल.ले.
६) संशोधन अधिकारी, ना.सं.घ./ रा.ना.मा.प.कक्ष
//- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.
७) वैयक्तिक धारिका
८) श्री.सु.तु.शिंदे, नगर रचनाकार,(से.नि.).